14 SEP 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रेशीम शेती पाहणी दौरा शेतकऱ्यांसाठी फलदायी ठरेल

## प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रेशीम शेती पाहणी दौरा शेतकऱ्यांसाठी फलदायी ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ प्राणीशास्त्र विभाग, सेंटर ऑफ इंक्युबेशन इन सेरिकल्चर व नाबार्ड बँक भारत सरकार यांच्या सहकार्याने जिल्ह्यातील २५ शेतकऱ्यांची सहल रेशीम शेती पाहणे दौरा कर्नाटकात १४ ते १६ सप्टेंबर या कालावधीत आयोजित केला आहे. मंगळवारी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर अभ्यास दौऱ्याच्या बसला झेंडा दाखवून सुरुवात झाली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर शेतकऱ्यांच्या रेशीम शेती पाहणे दौऱ्याच्या बसला झेंडा दाखविताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. ए. डी. जाधव, आशिष देशमुख, डॉ. भगवान खंडागळे, आशुतोष जाधव आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पाटील बोलत होते. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभाग प्रमुख आशिष देशमुख, रेशीम शास्त्र समन्वयक डॉ. ए. डी. जाधव, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव रमेश लिधडे, जिल्हा रेशीम अधिकारी डॉ. भगवान खंडागळे, नाबार्डचे जिल्हाप्रमुख आशुतोष जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

केंद्रीय रेशीम संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हैसूर, म्हैसूर विद्यापीठ रेशीम संशोधन केंद्र व चॉकी संगोपन केंद्र, प्रगतशील शेतकऱ्यांच्या भेटी व इतर शास्त्रज्ञ, संशोधन अधिकारी यांच्याशी शेतकऱ्यांचा संवाद ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यातील चंदगड, राधानगरी, हातकणंगले, करवीर तालुक्यातील निवडक रेशीम उत्पादक शेतकऱ्यांची अभ्यासदौऱ्यासाठी निवड केली आहे.

दौऱ्यांतर्गत शेतकऱ्यांना रेशीम शेतीची गुणवत्ता कोश उत्पादन, तुतीची लागवड त्याचे व्यवस्थापन व रोग व्यवस्थापन किडीचे नियंत्रण, रेशीम शेतीमध्ये शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती मिळार आहे. अशा प्रकारचा राज्यात प्रथमच नाबार्डच्या सहाय्याने शेतकऱ्यांसाठी उत्पन्न वाढीसाठी नवीन संकल्पना राबवली आहे.

तरूण भारत




कोल्हापूर : जिल्ह्यात रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची सहल कर्नाटकमधील म्हैसूरला रवाना होताना हिरवा झेंडा दाखवताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत व्ही. एन. शिंदे, डॉ. आशिष देशमुख, डॉ. ए. डी. जाधव, अजित चौगुले आदी.

# रेशीम शेतकऱ्यांची अभ्यास सहल म्हैसूरला

- शिवाजी विद्यापीठातील रेशीमशास्त्र विभागाचा उपक्रम

प्रतिनिधी

कोल्हापूर

रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची सहल कर्नाटक राज्यातील म्हैसूर येथील केंद्रीय रेशीम संशोधन व प्रशिक्षण संस्थेत १४ ते १६ सप्टेंबर यादरम्यान काढण्यात आली आहे. म्हैसूर विद्यापीठ रेशीम संशोधन केंद्र, कर्नाटकमधील कुछ खरेदी बाजारपेठ, चॉकी संगोपन केंद्र, प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतीला भेटी तसेच इतर शास्त्रज्ञ, संशोधन अधिकारी यांच्याशी संवाद साधला जाईल. तीन दिवसात रेशीमशेतीचे शास्त्रीय ज्ञान शेतकऱ्यांना दिले जाईल.

शिवाजी विद्यापीठात प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून अभ्यासदौऱ्याला सुरूवात झाली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख आशिष देशमुख, रेशीमशास्त्र समन्वयक डॉ. ए. डी. जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव रमेश लिधडे, जिल्हा रेशीम अधिकारी डॉ. भगवान खंडागळे, नाबार्डचे जिल्हाप्रमुख आशुतोष जाधव आदी उपस्थित होते. सेंटर ऑफ इंक्युबेशन इन सेरिकल्चर आणि नाबार्ड बँकेच्या सहकार्याने कोल्हापूर जिल्ह्यातील २५ शेतकऱ्यांची सहल रेशीम शेती पाहण्यासाठी कर्नाटकमध्ये गेली आहे. रेशीम शेतीमध्ये काम करणाऱ्या पती-पत्नीला प्राधान्य देण्यात आले आहे. विद्यापीठ प्रशासनाने सहलीचा संपूर्ण खर्च मंजूर केला आहे. गुणवत्ता, कोश उत्पादन, तुतीची लागवड, व्यवस्थापन, रोग व्यवस्थापन, किडीचे नियंत्रण अद्ययावत तंत्रज्ञान मिळावे, यासाठी या अभ्यास दौऱ्याचा उपयोग केला जाणार आहे. राज्यात प्रथमच नाबार्डच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठाने शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी नवीन संकल्पना राबवली आहे.

1 4 SEP 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय पातळीवर शाश्वत संशोधन हवे

## प्रा. अरुण पाटील : शिवाजी विद्यापीठात स्तुती योजनेअंतर्गत कार्यशाळेस उत्साहात सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संशोधन प्रकाशित करणे एवढाच उद्देश न ठेवता त्याचे व्यापारीकरण होऊन जगाला विविध पर्याय उपलब्ध केले पाहिजेत म्हणजेच आंतरराष्ट्रीय पातळीवर आता शाश्वत संशोधनाची गरज आहे, असे प्रतिपादन संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. अरुण पाटील यांनी केले.

केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित सिनरजिस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर (स्तुती) योजनेअंतर्गत १२ ते १८ सप्टेंबरदरम्यान शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील होते.



शिवाजी विद्यापीठात स्तुती कार्यक्रमाअंतर्गत आयोजित कार्यशाळेचे उदघाटन प्रसंगी डावीकडून संजय घोडावत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अरुण पाटील, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, सुचिता लोंखंडे उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. पाटील म्हणाले, आजकाल शाश्वत संशोधनाची गरज आहे. जग कशा पद्धतीने ऊर्जेकरीता वेगवेगळे पर्याय शोधत आहे. पूर्वीसारखे केवळ संशोधन प्रकाशित करणे हा उद्देश संशोधकांनी ठेवू नये. ते संशोधन जगभरात कसे पोहचेल आणि त्याचा एक पर्याय कसा उपलब्ध होईल. याकडे अधिक लक्ष द्यावे. कोणतेही उपकरण कितीही महाग असले तरी विकत घेणे सोपे झाले आहे. पण ते सांभाळणे आणि चालू स्थितीत ठेवणे अवघड आहे.

शास्त्रज्ञ सुचिता लोखंडे यांनी स्तुती आणि भारत सरकारचे विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय येथे उपलब्ध असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. स्तुतीचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी शिवाजी विद्यापीठातील सेफ-डीएसटी-सीएफसी केंद्रात उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक उपकरणांविषयी माहिती दिली. डॉ. पी. डी. डोंगळे यांनी स्वागत केले. डॉ. के. डी. पवार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले.

14 SEP 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सैफ सेंटर संशोधक विद्यार्थ्यांसाठी अनोखे केंद्र

## प्रा. सोनकवडे : विद्यापीठात 'स्तुती' अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित स्तुती उपक्रमांतर्गत उपकरणाची पाहणी करताना विद्यार्थी.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील सैफ सेंटर हे संशोधक विद्यार्थ्यांसाठी अनोखे केंद्र बनले आहे, असे प्रतिपादन 'स्तुती' उपक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. आर.जी.सोनकवडे यांनी केले.

विद्यापीठात 'स्तुती' अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पहिल्या दिवशी डी. वाय. पाटील संस्थेचे डॉ. जे. एल. गुंजकर यांनी 'नॅनो हायब्रीड मटेरियल'विषयी माहिती दिली. शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाचे प्रा. ए. व्ही घुले यांनी 'ॲडव्हान्सेस ऑन थर्मल अनालिसिस' विषयावर मार्गदर्शन केले. अत्याधुनिक उपकरणे संशोधक विद्यार्थ्यांना हाताळण्याची संधी स्तुती उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मिळाली आहे.

दुसऱ्या दिवशीच्या प्रथम सत्रात संजय घोडावत विद्यापीठाचे डॉ. संभाजी पवार यांनी 'सोलर सेल' विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. डी. एस. भांगे यांनी 'एक्सआरडी' उपकरणावर नमुने तपासणीविषयी माहिती दिली.

14 SEP 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधकांसाठी सैफ सेंटर प्रेरणादायी

## सैफ सेंटरचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात स्तुती अंतर्गत कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी प्रथम सत्रात संजय घोडावत विद्यापीठाचे डॉ. संभाजी पवार यांनी सोलर सेल या विषयावर मार्गदर्शन केले. त्यातील विविध संकल्पनांचा विज्ञान व तंत्रज्ञानामध्ये कसा उपयोग करावा याबाबतची माहिती दिली. शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना डॉ. डी. एस. भांगे यांनी या उपकरणावर नमुने तपासणीची प्रात्यक्षिके दाखवली.

डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे डॉ. जे. एल. गुंजकर यांनी 'नॅनो हायब्रीड मटेरियल' विषयी मार्गदर्शन केले. ऊर्जा आणि पर्यावरणीय विषयांसाठी नॅनो हायब्रीड मटेरियलचे उपयोग या विषयावर सामूहिक चर्चा झाली. रसायनशास्त्र विभागाचे डॉ. ए. व्ही. घुले यांनी 'ॲडव्हान्सेस ऑन थर्मल अनालिसिस' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. आर. जी. सोनकवडे सर्वोत्तम स्तुती समन्वयक आहेत. ते वैज्ञानिक आणि प्रशासकीय अनुभवाचा वापर करून स्तुती अंतर्गत अनेक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करतात, अशा शब्दात मान्यवरांनी कौतुक केले.



कोल्हापूर : प्रयोगशाळेत उपकरण हाताळणीचे प्रशिक्षण घेताना संशोधक विद्यार्थी.

सहभागीपैकी काहींनी आणलेले सॅम्पल देखील येथे टेस्ट करून दिले. दररोज विविध उपकरणे सहभागींना प्रत्यक्षात हाताळायला मिळणार आहेत. अत्याधुनिक उपकरणे संशोधक विद्यार्थ्यांना हाताळायची संधी स्तुती उपकरणाने उपलब्ध करून दिली आहे. डॉ. सोनकवडे यांनी भारत सरकारचा विज्ञान व तंत्रज्ञान विभागातील योजनांची माहिती दिली.

1 4 SEP 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत 'स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनुसूचित जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान' या विषयावर गुरुवारी (दि. १५) सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी



कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या वंदना केंगले-साबळे प्रमुख वक्त्या असणार आहेत. राष्ट्रीय संयोजक राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे दिलीप पवार यांच्यासह शामलाल कॉलेज, दिल्ली विद्यापीठ येथील प्रा. विवेकानंद नर्तम यांची विशेष उपस्थिती असणार आहे. कार्यशाळेस विद्यापीठाशी संलग्नित तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयातील कार्यरत असलेले शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती कार्यशाळेचे संयोजक डॉ. प्रमोद पांडव यांनी दिली.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात गुरुवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, भारत सरकार आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृतमहोत्सव अंतर्गत स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनुसूचित जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान या विषयावर कार्यशाळा होणार आहे. कार्यशाळेचे उद्घाटन गुरुवार, १५ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये होईल. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के भूषविणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, पुण्यातील सामाजिक कार्यकर्त्या वंदना केंगले-साबळे प्रमुख वक्त्या तर राष्ट्रीय संयोजक राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे दिलीप पवार, दिल्लीतील शामलाल कॉलेजचे प्रा. विवेकानंद नर्तम यांची विशेष उपस्थिती असणार आहे. कार्यशाळेस शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. प्रमोद पांडव यांनी केले आहे.



सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळा



कोल्हापूर : राष्ट्रीय अनुसूचित जनजाति आयोग, भारत सरकार आणि शिवाजी विद्यापीठतर्फे आजादी का अमृतमहोत्सव कार्यक्रमांतर्गत 'स्वातंत्र्य चळवळीमध्ये अनुसूचित जमातीच्या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेले योगदान' यावर गुरुवारी (ता. १५) सकाळी अकरा वाजता राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळा होईल. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित राहतील. पुणे येथील सौ. वंदना केंगले-साबळे वक्त्या आहेत. राष्ट्रीय संयोजक राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोगाचे दिलीप पवार, शामलाल कॉलेज दिल्ली विद्यापीठ येथील प्रा. विवेकानंद नर्तम विशेष उपस्थिती राहील, अशी माहिती संयोजक डॉ. प्रमोद पांडव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठातील भूगोल अधिविभागात आजपासून कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागात 'आयसीएसएसआर' संस्थेअंतर्गत सामाजिक शास्त्रे यामधील संशोधक विद्यार्थ्यांसाठी संशोधन पद्धती विषयावर दहा दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

कार्यशाळेचे उद्‌घाटन दि.१४ रोजी सकाळी ११ वाजता वनस्पतीशास्त्र विभागातील, निलांबरी हॉल येथे होणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा.डॉ.पी.एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कर्नाटक युनिव्हर्सिटी, धारवाडचे अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. एस. टी. बागलकोटी उपस्थित राहणार आहेत.

सकाळ

# भूगोल विभागात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागात आयसीएसएसआर संस्थेंतर्गत सामाजिक शास्त्रे यामधील संशोधक विद्यार्थ्यांसाठी १० दिवसीय संशोधन पद्धती विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन १४ रोजी सकाळी ११ वाजता वनस्पतीशास्त्र विभागातील नीलांबरी हॉल येथे होईल. कालावधी १४ ते २३ सप्टेंबर आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित राहतील. धारवाड येथील कर्नाटक युनिव्हर्सिटीचे अर्थशास्त्र अधिविभाग प्रा. डॉ. एस. टी. बागलकोटी, विविध विभाग प्रमुख शिक्षक, विद्यार्थी तसेच अन्य राज्यातून संशोधक विद्यार्थी उपस्थित राहतील. समन्वयक प्रा. डॉ. जे. बी. सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळेस सुरुवात होईल.

पुढारी नगरी

# 'भूगोल'बाबत आजपासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागात 'आयसीएसएसआर' संस्थेंतर्गत सामाजिक शास्त्रांच्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी संशोधन पद्धती या विषयावर १० दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेचे उद्‌घाटन दि. १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता वनस्पतीशास्त्र विभागातील नीलांबरी हॉल येथे करण्यात आले आहे. उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून कर्नाटक युनिव्हर्सिटी, धारवाडच्या अर्थशास्त्र अधिविभागाचे डॉ. एस. टी. बागलकोटी असणार आहेत. समन्वयक डॉ. जे. बी. सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा होणार आहे.

पुण्यनगरी

# राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा उद्यापासून

**कोल्हापूर :** 'स्वीमिंग हब'तर्फे दि. १५ ते १८ सप्टेंबर या कालावधीमध्ये यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन केले आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली. या स्पर्धेचे उद्‌घाटन दि. १५ रोजी सायंकाळी ५ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व सरोज पाटील यांच्या हस्ते होणार आहे. स्पर्धेसाठी कोल्हापूरमध्ये प्रथमच टचपॅड या सुविधेचा वापर केला जाणार आहे. स्पर्धा ५ ग्रुपमध्ये खेळवली जाणार असून, राजर्षी शाहू कॉलेज येथील सागर पाटील जलतरण तलाव येथे होणार आहेत. यासाठी राज्यभरातून ८ ते २१ वयोगटातील ५३८ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे. त्यापैकी २६० मुली व २७८ मुले आहेत. स्पर्धेचा बक्षीस समारंभ दि. १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. पत्रकार परिषदेस समीर चौगले, उमेश कोडोलीकर, किरण भोसले, रमेश मोरे, भाऊ घोडके आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठाकडून ४१२ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ४१२ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले. मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या ७४७ अभ्यासक्रमांपैकी विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षा एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने नुकत्याच सुरळीत पार पडल्या आहेत. १३ सप्टेंबर रोजी एमए (इंग्रजी, संस्कृत), एमसीए (कॉमर्स), एमए (वुमन स्टडीज), एम.एस्सी. (ऑर्ग्यनिक केमेस्ट्री), बी.टेक., बी.व्होक (नर्सिंग), एम.एस्सी. (मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट) आदी २५ परीक्षांचे निकाल जाहीर झाले.

७४७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा 'ओएमआर' उत्तरपत्रिकांचा वापर करून घेण्यात आल्या आहेत. ओएमआर शिटवर विद्यार्थ्यांनी त्यांचा पीआरएन नंबर, बैठक क्रमांक, विषय सांकेतांक माहिती चुकीची लिहिल्याने संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालात अनुपस्थित असे नमूद होऊन निकाल घोषित केले. अशा विद्यार्थ्यांचे निकाल सुधारित करण्यासाठी आवश्यक माहिती संकलित केली जात आहे. त्यासाठी सर्व अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या लिंकवर परीक्षा ॲप्रूव्ह करण्यासाठी लॉगीन आयडी पासवर्डचा वापर करून माहिती सादर करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

लोकमत

# विद्यापीठाकडून सुधारित निकालाची प्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** उत्तरपत्रिकांवर चुकीची माहिती लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचा निकाल सुधारित करण्याची प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सुरू केली आहे. या प्रक्रियेसाठी लागणाऱ्या माहितीचे संकलन करण्यात येत आहे. अशा विद्यार्थ्यांची माहिती अधिविभाग आणि महाविद्यालयांनी लवकर ऑनलाईन सादर करावी, असे आवाहन परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी मंगळवारी केले. ७४७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा या ओएमआर उत्तरपत्रिकांचा वापर करून घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी त्यांचा पीआरएन नंबर, बैठक क्रमांक, विषय सांकेतांक, आदी माहिती चुकीची लिहिल्याने संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये अनुपस्थित असा उल्लेख होऊन निकाल घोषित झाला आहे. सुधारित करण्यासाठी आवश्यक ती माहिती संकलित करण्यात आली. त्यासाठी सर्व अधिविभाग, महाविद्यालयांनी परीक्षा मंडळाकडे माहिती सादर करावी. परीक्षा मंडळाने एम. ए. (इंग्लिश), एमसीए (कॉमर्स), एम. ए. (हिंदी), बी. टेक, आदी विविध २५ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले.

14 SEP 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिंदी साहित्य संशोधन, रोजगाराभिमुख कोर्सेसमुळेच विद्यार्थी घडले

## ३०० हून अधिक पीएच.डी. संशोधक; देशातील नामवंत साहित्यिकांची विभागास भेट

### हिंदी भाषा संवर्धन दिन विशेष..

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागात गेल्या काही वर्षांपासून देश पातळीवर नामांकित साहित्यिकांच्या साहित्यावर संशोधन सुरू आहे. विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा म्हणून नवीन कोर्सेस सुरू झाले आहेत. यामुळे अनेक विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक घडले आहेत.



१४ सप्टेंबर १९४९ रोजी राज्यघटनेत हिंदी भाषेला राजभाषा म्हणून दर्जा मिळाला. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस हिंदी भाषेचा सन्मान दिवस म्हणून साजरा केला जातो. शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाची स्थापना १९९३ झाली. अल्पावधीतच हिंदी विभागाने उज्ज्वल कामगिरी केली आहे. यात प्रामुख्याने हिंदी ज्ञानपीठ मिळविणारे पहिले लेखक सुमित्रानंदन पंत यांची जन्मशताब्दी २००१ साली साजरी केली. याप्रसंगी हिंदी भाषेचे ज्येष्ठ समीक्षक डॉ. नामवर सिंह विद्यापीठात कार्यक्रमासाठी आले होते. गोविंद मिश्र, मैत्रीय पुष्पा, मोहनदास नेमिषराय, मॅनेजर पांडे, सूर्यप्रसाद दीक्षित यांच्यासारखी हिंदीतील नामवंत साहित्यिक मंडळी हिंदी विभागातील उपक्रमासाठी आल्याने याचा विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांना फायदा झाला आहे.

काळाच्या पुढे जात हिंदी विभागात विविध विषय, साहित्यिकांवर संशोधन सुरू आहे. आतापर्यंत ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संशोधन पदवी मिळविली आहे. ज्ञानपीठ विजेते निर्मल वर्मा यांच्या साहित्यावर डॉ. रघुनाथ शिरगावकर यांनी संशोधन केले. श्रीलाल शुल्क यांच्या साहित्यावर डॉ. भारत साळुंखे यांनी संशोधन केले. कृष्णा सोबती यांच्या साहित्यावर डॉ. सुलोचना अंत्रेडी यांनी संशोधन केले. त्यानंतरच संबंधित साहित्यिकांना ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले.

हिंदी विभागात प्रसिद्ध साहित्यिका मैत्रीय पुष्पा यांच्या साहित्यावर पहिले संशोधन डॉ. लक्ष्मण पाटील यांनी केले. मेरठ येथील संस्थेतर्फे देशातील उत्कृष्ट पीएच.डी. शोधप्रबंधाचा अमनसिंह अत्रे पुरस्कार २००२ रोजी डॉ. प्रकाश चिकुर्डेकर यांच्या प्रकाशित प्रबंधास देण्यात आला. तत्कालीन हिंदी विभागप्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण लिखित 'अनुवाद समस्याएं एवंम समाधान' या पुस्तकाचा तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते सन्मान केला गेला.

> शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाने उल्लेखनीय काम केले आहे. येथे संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक, अनुवादक, निवेदक, हिंदी अधिकारी घडले आहेत. काळाच्या पुढे जाऊन हिंदी विभागाने केलेल्या संशोधनाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली आहे. हिंदी विभागातील प्राध्यापकांना देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळाली. सध्याच्या काळात हिंदी भाषेला चांगले दिवस आले आहेत.
>
> **- डॉ. अर्जुन चव्हाण,** ज्येष्ठ हिंदी समीक्षक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### नाट्यलेखन, लघुपट तयार करण्याची संधी

हिंदी विभागात हिंदी अनुवाद पदविका अभ्यासक्रम, भाषा प्रौद्योगिकी अभ्यासक्रम सुरू आहेत. अनुवादाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध झाल्या आहेत. शासकीय सेवेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. भाषा प्रौद्योगिकी अभ्यासक्रमामुळे कादंबरी, दीर्घकाव्य, कथा यावर नाट्यलेखन, चित्रपट, लघुपट व डॉक्युमेंट्री तयार करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे.

14 SEP 2022 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोशल मीडिया ठरतेय हिंदी भाषा संवर्धनाचे परिमाण




- व्हॉटसअॅप, ट्विटर, इन्स्टाग्राम, फेसबुकवर हिंदी भाषेचा वापर
- हिंदी भाषा देश-विदेशात नंबर एकची दावेदार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

सोशल मीडिया, टीव्ही मालिका, चित्रपट, कार्टुन्स माध्यमातून हिंदी भाषा सहजपणे आणि सलगपणे कानावर पडते. परिणामी हिंदी समजणे आणि तोंडवळणी पडणे यातून ती भाषा बोलणे अवघड राहिलेले नाही. अलीकडे हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषेतील काही शब्दांच्या एकत्रिकरणातून नवीन वॉटस्‌अॅपवरील 'हिंग्लीश' भाषा उदयांस आली आहे. व्हॉटसअॅप, व्टिटर, इन्स्टाग्राम, ब्लॉग, फेसबुक, युट्युबवर हिंदीचा वापरही वाढल्याचे चित्र आहे. या अर्थाने सोशल मीडिया हे माध्यम हिंदी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरतेय. यातून हिंदी चौकटीबाहेर जाऊन बोलली, वाचली आणि आत्मसात केली जात आहे. हेच हिंदी भाषा संवर्धनाचे नवे परिमाण म्हटले तर वावगे ठरणार नाही.

कायद्याने राष्ट्रभाषा नसून राजभाषा म्हणून हिंदी भाषेचा गौरव केला आहे. हिंदीबरोबर अन्य भारतीय भाषांना राजभाषा म्हणून स्विकारले असल्याने १४ सप्टेंबर हा हिंदीसह अन्य २२ भाषांचा गौरव दिन आहे. यानिमित्ताने हिंदीचा वाढलेला वापरात सोशल मीडियाचे स्थान महत्वाचे असल्याचे एका निरीक्षणातून पुढे आले आहे. मराठी प्रमाणेच हिंदी ही देवनागरी अक्षरांची भाषा आहे. मराठीशी साध्यर्म असणारी ही भाषा असल्याने मराठी भाषिकांनाही ती आपलीशी वाटते. परिणामी दक्षिणेत स्थानिक भाषेच्या जोडीला इंग्रजीचे प्राबल्य दिसते. उत्तर भारतात बहुतांश हिंदी हीच बोलीभाषा दिसते. याउलट मराठीशी साध्यर्म असल्याने हिंदी भाषा महाराष्ट्रात सहज बोलली जाते. समजते हे वैशिष्ट आहे.



सोशल मीडियावरील हिंदी भाषा कोणालाही सहज समजेल, अशी आहे. सातत्याने कार्टुन, शॉटस् पाहून काही लहान मुलांना तर मराठीपेक्षा हिंदी भाषा सोपी आणि आपलीशी वाटते. काही मुल दररोजच्या व्यवहारात सातत्याने हिंदी भाषेचा वापर करताना दिसतात. अगदी अडाणी माणसालाही हिंदी चित्रपट, मालिका पाहून हिंदी भाषा कळते, पण बोलता येत नाही, अशी अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. हिंदी भाषेवर प्रभुत्व असलेल्या व्यक्तीला देश-विदेशात रोजगाराच्या अनेक संधी आहेत. पुणे, मुंबईसारख्या शहरात नोकरीसाठी स्थायिक झालेल्या लोकांवर हिंदी भाषेचा इतका प्रभाव आहे, की हिंदी भाषा त्यांच्या दैनंदिन व्यवहाराची भाषा झाल्याचे दिसते.




भाषा संवादाचे साधन असल्याने कोणतीही भाषा माणसांना जोडणारी असून, तज्ज्ञांनी शुध्द भाषेचा आग्रह धरू नये. भाषा कोणाचीही वाट न पाहता ती प्रवाहाबरोबर बदलत राहते. भाषा संप्रेषणासाठी इतर भाषेतील शब्द स्वत:मध्ये सामावून घेत स्वत:ची प्रगती करीत राहते. त्यामुळे शब्दाच्या प्रतिशब्दाचा आग्रह न धरता इतर भाषेचा प्रचलित शब्द आहे तसा स्वीकारला पाहिजे. हिंदी, मराठी, इंग्रजी एकमेकांना सामावून घेत पुढे जाताना दिसतेय. या हिंग्लीश संक्षिप्त भाषेमुळे कमी वेळेत अधिक व्यक्त होता येते ही सर्वच भाषांची मोठी ताकद म्हणावी लागेल. सोशल मीडियाच्या माध्यमातून युवा पिढीने भाषेची संक्षिप्त रुप स्वीकारलें आहेत, त्यातून अर्थबोध होतो त्यामुळे भाषाशास्त्राप्रमाणे बदल झाले पाहिजेत, असा आग्रह भाषातज्ज्ञ धरत नाहीत.

**हिंदी भाषेत रोजगाराच्या संधी**

हिंदी भाषेवर प्रभुत्व असणाऱ्यांना अनेक क्षेत्रात रोजगार सहज मिळतात. इंग्रजी, मराठीसह अन्य भाषांचा हिंदीत अनुवाद करणे. अनुवाद, लिखाण, जाहिरात, निवेदन, संपादन, डॉक्युमेंट्री, पटकथा, संवाद लिखान, खेळाची कॉमेंट्री आदी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. सोशल मीडियासह सर्वच क्षेत्रात हिंदी भाषा आपल अस्तित्व वाढवत आहे.

**हिंदी-मराठी भाई-भाई**

मराठी आणि हिंदी भाषेत साध्यर्म असल्याने जास्तीत जास्त हिंदी भाषिक अधिकारी महाराष्ट्रात येतात. हिंदी आणि मराठी भाषेतील अक्षरे देवनागरीतील असल्याने दोन्ही भाषा समजण्यास, बोलण्यास सोप्या आहेत. परिणामी हिंदी भाषिक महाराष्ट्रात आल्यानंतर काही महिन्यातच उत्कृष्ट मराठी भाषा बोलतात. त्यामुळे हिंदी-मराठी भाई-भाई असेही म्हटले जाते.

### हिंदी भाषा समृध्दीसाठी चित्रपट महत्वाचे साधन



हिंदी भाषा समृध्दीसाठी ज्ञानपीठ विजेत्यांबरोबरीने हिंदी गायक, अभिनेत्री, अभिनेत्यांचे मोठे योगदान आहे. मालिका, चित्रपट हिंदी भाषा संवाद साधण्याचे महत्वाचे साधन आहे. अनेकदा हिंदी चित्रपट, मालिकांनी इंग्रजी, मराठी भाषेतील प्रचलित शब्द स्वीकारून आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. याला भाषा तज्ज्ञांनीही मान्यता दिली आहे.

**डॉ. अर्जुन चव्हाण (माजी हिंदी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ)**

### हिंदी जनभाषा म्हणून प्रगत

हिंदी भाषेला राष्ट्रीय भाषा नव्हे तर राजभाषा म्हणून कायद्याने स्वीकारले आहे, परिणामी हिंदी कार्यालयीन बोली भाषा झाली असली तरी कागदपत्रातील भाषा झालेली नाही. संसदेत हिंदी भाषेत चर्चा होते पण त्याचा इतिवृतांत अहवाल इंग्रजी भाषेत तयार केला जातो. युनोने हिंदी भाषेक कामकाज करण्यास मान्यता देऊन ते स्वीकारले आहे. त्यामुळे हिंदी भाषा इंग्रजीला मागे सारत जगातील भाषेत नंबर वनची दावेदार झाली असूनही राजकीय क्षेत्रात हिंदी भाषेची उपेक्षा झाली आहे. परंतू जनभाषा म्हणून हिंदीची प्रगती झाली आहे.

लोकमत

# ऑनलाइन पदवीला आता समकक्ष दर्जा

## विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दूरशिक्षण आणि ऑनलाइन पदवीला यापुढे पारंपरिक पदवीचा समकक्ष दर्जा असेल. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) हा निर्णय घेतला आहे. यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी याबाबतचे परिपत्रक नुकतेच संकेतस्थळावर प्रसिद्ध केले असून, ऑनलाइन आणि दूरशिक्षणाद्वारे पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे.

येत्या काळात दूरशिक्षण, ऑनलाइन पदवी, पदव्युत्तर, पदविका अभ्यासक्रमांच्या प्रतिसादात यामुळे निश्चित वाढ होणार आहे.

कोरोना काळात ऑनलाइन आणि दूरशिक्षण अभ्यासक्रमांमध्ये वाढ झाली. आता यूजीसीच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचा ऑनलाइन, दूरशिक्षण अभ्यासक्रमांकडे असलेला कल कायम राहू शकणार आहे. यूजीसीने या पूर्वीच्या परिपत्रकांतून काही पदवी अभ्यासक्रमांना आवश्यक असलेला क्षेत्र अनुभवाचा तपशील स्पष्ट केला आहे.

### ऑनलाइन पद्धतीने राबविता येणार नाहीत

- दूरशिक्षण आणि ऑनलाइन कोणते अभ्यासक्रम राबवता येतील, कोणते राबवता येणार नाहीत हेही काही दिवसांपूर्वी जाहीर केले आहे.
- त्यानुसार दूरशिक्षण आणि ऑनलाइन पद्धतीने अभियांत्रिकी, वैद्यकीय, फिजिओथेरपी असे काही अभ्यासक्रम राबवता येणार नसल्याचेही यूसीसीने नमूद केले आहे.

यूजीसीच्या २०१४ मधील पदवीच्या अधिकृततेसंदर्भातील अधिसूचना, यूजीसीशी संलग्न उच्च शिक्षण संस्थांद्वारे दूरशिक्षण आणि ऑनलाइन पद्धतीने घेतलेल्या पदवीपूर्व आणि पदव्युत्तर स्तरावरील पदवी, पदविकांना मान्यता देण्यात आली आहे. आता दूरशिक्षण व ऑनलाइन पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका, पारंपरिक पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदविका यांना समकक्ष असतील, असे नमूद करण्यात आले आहे.

पुढारी

# दूरशिक्षण, ऑनलाईन पदवीला पारंपरिक पदवीची समकक्षता

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) दूरशिक्षण आणि ऑनलाईन पदवीला पारंपरिक पदवीची समकक्षता देण्यात आली आहे. या निर्णयामुळे दूरशिक्षण घेणाऱ्या तसेच पदवी, पदव्युत्तर, पदविका अभ्यासक्रम ऑनलाईन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

येत्या काळात असे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये वाढ होणार असून, त्यांच्या पदवीला आता वजन प्राप्त होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. यूजीसीचे सचिव प्रा. रजशीन जैन यांनी परिपत्रकाद्वारे संबंधित माहिती दिली आहे. दूरशिक्षण अभ्यासक्रम नियमावली २२ अंतर्गत यूजीसीने मान्यताप्राप्त संस्थांमधून दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षणाद्वारे प्राप्त केलेली पदवी ही पारंपरिक पद्धतीने प्रदान केलेल्या पदवीला समकक्ष असल्याबाबतचा निर्णय यूजीसीच्या मुक्त आणि दूरशिक्षण अभ्यासक्रम आणि ऑनलाईन अभ्यासक्रम नियमावली २०२२ च्या नियम २२ नुसार घेण्यात आला आहे.

14 SEP 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन शिक्षण 'राजमान्य' : डॉ. सोनावणे

## 'यूजीसी'कडून ऑनलाईन, दूरस्थ शिक्षणातील पदव्यांना पारंपरिक पदव्यांची समकक्षता

पुणे : गणेश खळदकर



नवीन शैक्षणिक धोरणातील उच्चशिक्षित विद्यार्थ्यांचे ध्येय केवळ पारंपरिक शिक्षणातून पूर्ण होणे शक्य नाही. त्यामुळे ऑनलाईन, दूरस्थ शिक्षण हा एक चांगला पर्याय आहे; परंतु यातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी पारंपरिक शिक्षणाएवढेच महत्त्व संबंधित शिक्षणाला देणे गरजेचे होते. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात, यूजीसीने ऑनलाईन, दूरस्थ शिक्षणातील पदव्यांना पारंपरिक पदव्यांची समकक्षता देऊन ऑनलाईन शिक्षणाला एकप्रकारची राजमान्यताच दिली, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले, 'भारतातील १६ ते २६ वयोगटांतील ५० टक्के मुलांना २०३० पर्यंत उच्चशिक्षित करण्याचे ध्येय ठेवले आहे. सध्या २६ टक्के विद्यार्थी उच्चशिक्षण घेत आहेत. त्यांची संख्या साधारणतः सव्वा कोटी आहे. येत्या काळात तब्बल अडीच कोटी विद्यार्थ्यांना उच्चशिक्षित करावे लागणार आहे. यासाठी पायाभूत सुविधा उदा., वर्गखोल्या, प्राध्यापक, अन्य मनुष्यबळ उपलब्ध करावे लागणार आहे. ते एवढ्या कमी कालावधीत उपलब्ध करणे शक्य नाही. त्यामुळे देशातील ५० टक्के विद्यार्थ्यांना उच्चशिक्षित करण्याचे ध्येय गाठायचे असेल, तर आपल्याला इतर मार्गांचा उपयोग करणे आवश्यक आहे. त्यासाठीच दूरस्थ शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण हा एक चांगला मार्ग आहे. परंतु, या शिक्षणासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये विश्वास केव्हा निर्माण होईल, ज्यावेळी विद्यार्थ्यांना वाटेल की त्यांनी दूरस्थ शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षणाद्वारे मिळवलेल्या पदव्या आणि पारंपरिक शिक्षणातून घेतलेल्या पदव्या एकच आहेत, त्यांना समान दर्जा आहे. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण आणि दूरस्थ शिक्षणातील विद्यार्थ्यांचा टक्का वाढविण्यासाठी यूजीसीने घेतलेला निर्णय आनंददायी आणि स्तुत्य असल्याचे ते म्हणाले.

### ऑनलाईन शिक्षण स्वस्त होईल...

परदेशात ऑनलाईन किंवा दूरस्थ शिक्षण पूर्वीपासूनच सुरू आहे. त्यासाठी त्यांनी ई-कंटेंट विकसित केलेला आहे. तशा प्रकारचा प्रादेशिक भाषेत किंवा स्थानिक गरजांनुसार आवश्यक ई-कंटेट भारतात अद्याप विकसित करण्यात येत नाही. परंतु, आता ऑनलाईन शिक्षणालाच समकक्षता देण्यात आल्यामुळे त्यादृष्टीनेदेखील पावले उचलली जातील. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातदेखील ई-कंटेंट विकसन कक्ष विकसित करत आहोत. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ई-कंटेंट तयार करण्यात येत आहे. ऑनलाईन शिक्षणाची जमेची बाजू म्हणजे विद्यार्थी त्यांचा कामधंदा बघून शिक्षण पूर्ण करणार आहेत. ऑनलाईन शिक्षणासाठी भौतिक सुविधांची फारशी आवश्यकता नाही. त्यामुळे शुल्क नियमन करणाऱ्या प्राधिकरणांनी प्रत्यक्ष खर्चावर आधारित शुल्करचना केली, तर शुल्क कमी होण्यासदेखील मदत होणार असल्याचे डॉ. सोनावणे यांनी स्पष्ट केले.

आमने